# महाराष्ट्र शासन

**<u>महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी</u>**

द्वारा १/१५, फिरुज-आरा इमारत (पश्चिम बाजू),
पेट्रोल पंपच्या समोर, मंत्रालयाजवळ, महर्षि कर्वे रोड, मुंबई -४०००२१

## कंत्राटी तत्वावर करार पद्धतीने नियुक्ती

महाराष्ट्र राज्य-सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी, मंत्रालय, मुंबई या कार्यालयात संचालक (सामाजिक अंकेक्षण) या पदावर कंत्राटी तत्वावर करार पद्धतीने नियुक्ती करावयाची आहे. विहीत शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. इच्छुक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज दिनांक ६ मार्च, २०२६ पर्यंत सादर करावेत. सदर पदावरील नियुक्तीसाठी पात्रता तसेच कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा सविस्तर तपशिल शासनाच्या **www.mahaegs.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

स्वाक्षरी/-
संचालक,
महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व
पारदर्शकता सोसायटी, मंत्रालय, मुंबई-३२

# महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी

**न्यास नोंदणी क्र.एफ-७१७३५ (एम), दिनांक २७ जुलै, २०१८**
**द्वारा १/१५, फिरुज-आरा इमारत (पश्चिम बाजू),**
**मंत्रालयाजवळ, महर्षि कर्वे रोड, मुंबई -४०००२१**

## संचालक (सामाजिक अंकेक्षण) या पदावर कंत्राटी तत्वावर करार पद्धतीने नियुक्ती.

**संचालक पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या:-**

१. संचालक हे महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीचे प्रशासकीय प्रमुख व कार्यालय प्रमुख असतील. राज्यातील सामाजिक अंकेक्षणाच्या संपूर्ण प्रक्रियेसाठी ते जबाबदार असतील.
२. सामाजिक अंकेक्षणासाठी उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाच्या सहाय्याने सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेबाबत केंद्र व राज्य शासनाच्या सर्व तरतुदींची/नियमांची अंमलबजावणी करणे.
३. सामाजिक अंकेक्षणासाठी निश्चित केलेल्या राज्य व केंद्र शासनाच्या सर्व योजनेतील तरतुदींनुसार सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेचे नियोजन व अंमलबजावणी करणे.
४. सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया राबविण्याच्या प्रचलित व्यवस्थेमध्ये व कार्यपद्धतीमध्ये केंद्र शासनाच्या धोरणानुसार सुधारण करणे व सुलभ कार्यप्रणाली निर्माण करणे.
५. सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेच्या कार्यक्रमाचा वर्षनिहाय कृती आराखडा तयार करणे व तो केंद्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करणे.
६. सामाजिक अंकेक्षणाच्या कामासाठी शासनाच्या मान्येतेने सेवाकरार पद्धतीने/कंत्राटी तत्वावर अधिकारी/कर्मचाऱ्यांची आवश्यकतेनुसार नियुक्ती करणे.
७. कामात एकसुत्रता राहण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावरील अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांना मार्गदर्शन करणे व त्यांच्या कामांमध्ये समन्वय राखणे.
८. सामाजिक अंकेक्षण झाल्यानंतर दस्तऐवजांची नोंद/पूर्तता राज्य व केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड होत असल्याची खात्री करणे.
९. सामाजिक अंकेक्षणाचे जिल्हानिहाय अहवाल केंद्र व राज्य शासनास वेळोवेळी सादर करणे तसेच त्यांचे जतन करणे.
१०. सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेत अनियमितता करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याकरिता शासनाच्या मान्यतेने संबंधित यंत्रणेस शिफारस करणे.
११. सामाजिक अंकेक्षणासंबंधी राज्य, जिल्हा व तालुकास्तरावरील यंत्रणेच्या कामावर नियंत्रण ठेवून त्यांच्या कामाचे नियमित मूल्यामापन करणे.

१२.सामाजिक अंकेक्षणाचा मासिक, त्रैमासिक व वार्षिक अहवाल तसेच Action Taken Report तयार करुन शासनास सादर करणे. आवश्यकतेनुसार विभागाच्या Website वर जन माहितीकरिता अपलोड करणे.

१३.राज्यातील सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया राबविण्यासाठी वेळापत्रक तयार करणे. केंद्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करणे व त्यांची अंमलबजावणी करणे.

**करार पध्दतीने नियुक्तीसाठी पात्रता व अटी-शर्ती :**

१. संचालक पदावर नियुक्तीसाठी उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान पदवी परीक्षा उत्तीर्ण असावा. समाजशास्त्र विषयात पदवी किंवा पदव्युत्तर शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवाराला प्राधान्य देण्यात येईल.

२. उमेदवाराला सामाजिक अंकेक्षण क्षेत्रातील प्रत्यक्ष कामकाजाचा किमान दोन वर्षाचा अनुभव असावा.

३. उमेदवाराला राज्य व केंद्र शासनाच्या सर्व कल्याणकारी योजनांविषयक ज्ञान तसेच अंकेक्षण कामकाजाचा अनुभव असावा.

४. मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा अवगत असावी.

५. उमेदवाराचे वय जाहिरातीच्या दिनांकास ६२ वर्षापेक्षा जास्त नसावे.

६. उमेदवाराविरुध्द त्यांच्या पूर्वीच्या नियुक्तीच्या कालावधीत कोणतीही शिस्तभंग विषयक कारवाई झालेली नसावी किंवा प्रलंबित नसावी.

७. सेवाकरार काळात सेवा समाधानकारक नसल्यास एकतर्फी काढून टाकण्याचा अधिकार सोसायटीस राहील.

८. इच्छुक उमेदवाराने विहीत नमुन्यातील आपला अर्ज, संपुर्ण माहितीसह व त्या पृष्ठ्यर्थ सर्व कागदपत्रांच्या प्रतीसह सादर करावा. हा अर्ज संचालक, महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी द्वारा १/१५, फिरुज-आरा इमारत (पश्चिम बाजू), मंत्रालयाजवळ, महर्षी कर्वे रोड, मुंबई-४०० ०२१ यांच्या नावे दि. ६ मार्च, २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहचेल अशा बेताने पाठवावा.

९. शैक्षणिक अर्हता, अनुभव, कार्यक्षेत्रातील सेवेचा कालावधी इत्यादी बाबींचा प्राधान्याने विचार करुन मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल.

स्वाक्षरी/-
संचालक,
महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व
पारदर्शकता सोसायटी, मंत्रालय, मुंबई

# महाराष्ट्र राज्य-सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी, मुंबई
## संचालक पदासाठी अर्ज

अर्जदाराचा फोटो

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे संपूर्ण नाव | श्री./श्रीमती |
| २. | जन्म दिनांक | |
| ३. | जाहिरातीच्या दिनांकास वय | ---- वर्ष -----महिने |
| ४. | सध्याचा पत्ता | |
| ५. | कायमचा पत्ता | |
| ६. | संपर्क क्रमांक व ई-मेल आयडी | Mobile<br>E-mail :- |
| ७. | शैक्षणिक अर्हता | |

| परीक्षा | उत्तीर्ण वर्ष | बोर्ड/विद्यापीठ | प्राप्त गुण % |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

| | | |
|---|---|---|
| ८. | इतर शैक्षणिक अर्हता | |
| ९. | सेवानिवृत्तीच्या वेळची माहिती | शेवटी धारण केलेले पद<br>कार्यालयाचे नाव व पत्ता |
| १०. | सेवानिवृत्ती दिनांक | |
| ११. | एकूण सेवा कालावधी | ----- वर्ष ------- महिने |
| १२. | सेवा कालावधीतील कामाचा अनुभव | |

| कार्यालय/विभाग | धारण केलेले पद | कालावधी<br>पासून-पर्यंत | कामाचे थोडक्यात स्वरुप |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

| | | |
|---|---|---|
| १३. | अवगत असलेल्या भाषा | |

**सुचना:-वरील माहीतीच्या पृष्ठ्यर्थ सर्व कागदपत्राच्या प्रती अर्जासह सादर कराव्यात.**

**(कृ.मा.प.)**

उपरोक्त तपशिल माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व खरा आहे. दिलेली माहिती अथवा त्यातील काही भाग दिशाभूल करणारा अथवा चुकीचा आढळल्यास माझी उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी, मुंबई यांना राहतील, याची मला जाणीव आहे.

स्वाक्षरी

**दिनांक:-**

**ठिकाण:-**

(------------------------)

उमेदवाराचे नाव